प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर,
संपादक / वृत्तसंपादक

प्रसिध्दी पत्रक क्र. १२
दिनांक : ०२.१२.२०२४

( सुदास सावंत )
जनसंपर्क अधिकारी

---

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बेस्ट उपक्रमातर्फे शिवाजी पार्क,दादर येथे उपस्थित जनसमुदायाकरिता पुरविण्यात येणा-या सेवा सुविधा

मुंबई, ०२ - बेस्ट उपक्रमातर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दिनांक ५ ते ६ डिसेंबर २०२४ रोजी दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील पुढीलप्रमाणे विविध प्रकारच्या सेवा सुविधा पुरविण्यात येणार आहे.

**<u>वीजपुरवठा विभागाकडून पुरविण्यात येणा-या सुविधा -</u>**

मुंबई शहराला विद्युत पुरवठा करणारा बेस्ट उपक्रम आपल्याकडील अत्याधुनिक तंत्रशास्त्र आणि मनुष्यबळ यंत्रणेसह, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ०४, ०५ व ०६ डिसेंबर २०२४ रोजी, दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विविध प्रकारच्या सेवा पुरविण्यासाठी सज्ज झालेला आहे. त्याबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे :

...२....

Scanned with OKEN Scanner

**अ) ग्राहक सेवा (जी/उत्तर) विभाग –**

१) मंडप / तंबूंना तात्पुरता वीजपुरवठा देणे - चैत्यभूमी व शिवाजी पार्क मैदान परिसरातील महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या विविध संस्थांच्या मंडप / तंबूंना तात्पुरता वीजपुरवठा निवासी (धार्मिक) वीजदराने देण्यात येणार आहे. अर्जदार उपक्रमाच्या दादर येथील ग्राहक सेवा जी /उत्तर. विभागीय कार्यालयातही दि. ०४ डिसेंबर पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करु शकतात.

कार्यालयीन पत्ता:

विभागीय अभियंता, ग्राहक सेवा (जी/उत्तर) प्रभाग,
दुसरा मजला, परिवहन अभियांत्रिकी इमारत,
टिळक रोड, दादर (पूर्व), मुंबई – ४०० ०१४.
दूरध्वनी क्र. २४१९४५०६ / २४१९४५५५.

२) दिनांक : ०४ डिसेंबर पासून ०६ डिसेंबर २०२४ पर्यंत शिवाजी पार्क मैदानात (नाना नानी पार्क जवळ) तात्पुरता वीज पुरवठयासाठी एक खिडकी योजना उभारण्यात येत आहे. वेळ : सकाळी १०.०० वा ते रात्री १८.०० वा. पर्यंत.

अर्जदाराने अर्जासोबत नोंदणी शुल्क भरावे व आवश्यक कागदपत्रे व माहिती उपक्रमाला द्यावी. अर्जदाराने मागणी अर्जात संस्थेचे नाव, संपूर्ण पत्ता, पुरवठा हवा असलेला कालावधी तसेच संस्थेच्या जबाबदार प्रतिनिधीचे नाव व दूरध्वनी / मोबाईल क्रमांक लिहिणे. अनामत रक्कमेचा परतावा इ.सी.एस. पध्दतीने / NEFT द्वारे अर्जदाराच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी विहित नमून्यातील प्रपत्र भरणे. मागणी अर्ज मंजूर झाल्यानंतर जोडणी शुल्क मागणी भारावरील सुरक्षा अनामत रक्कम व वीजमापक अनामत रक्कम भरावी.



Scanned with OKEN Scanner

| १. मागणी अर्ज नोंदणी शुल्क : | २. जोडणी शुल्क : |
|---|---|
| अ) एकेरी प्रावस्था रु. ५०/-<br>ब) तिहेरी प्रावस्था रु.७५/- | अ) एकेरी प्रावस्था रु. १५०/-<br>ब) तिहेरी प्रावस्था रु.२००/- |
| ३. सुरक्षा अनामत रक्कम :<br>अ) वर्ष २०२३ च्या तात्पुरत्या वीजपुरवठयाच्या वीजदेयका एवढे<br>ब) रु.२०/- प्रति दिवस प्रति किला वॅट (फक्तनवीन अर्जदारांसाठी) | ४. वीजमापक अनामत रक्कम :<br>अ) रु.१०००/- एकेरी प्रावस्था विजमापक.<br>ब) रु.३०००/- तिहेरी प्रावस्था विज़मापक (६० किलो वॅट पर्यंत)<br>क) रु.४०००/- सि.टी. विजमापक (६० किलो वॅट पेक्षा जास्त). |

३) वीजेचा दर (१ एप्रिल २०२४ च्या खालील दरपत्राप्रमाणे ) :-

| ग्राहक प्रवर्ग (युनिट) | * स्थिर / मागणी आकार | व्हिलींग आकार (रु./ युनिट) | ऊर्जा आकार (रु./ युनिट) |
|---|---|---|---|
| ० – १०० एकांक | रु. ९० (दरमहा) | १.९७ | १.८७ |
| १०१ – ३०० एकांक | रु. १३५ (दरमहा) | १.९७ | ५.४६ |
| ३०१ – ५०० एकांक | रु. १३५ (दरमहा) | १.९७ | ९.५६ |
| ५०० एकांक पेक्षा जादा | रु. १६० (दरमहा) | १.९७ | ११.७३ |

* तात्पुरती विद्युत जोडणी ही स्थिर आकाराच्या १.५ पटीच्या अधिन असेल.



Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या नियमाप्रमाणे वीजवापराचे देयक (वापरण्यात आलेले युनिट X ऊर्जा आकार प्रति युनिट) + (स्थिर आकार X १.५) + व्हिलींग आकार + इंधन समायोजन आकार + विद्युत शुल्क + महाराष्ट्र कर (M Tax) + इतर कर मिळून गणना करण्यात येईल.

अनामत रकमेचा परतावा : इ.सी.एस. पद्धतीने / NEFT **द्वारे** अनामत रक्कमेच्या पावती शिवाय देण्यात येईल.

**ब) <u>अखंडित वीज पुरवठयाकरीता व्यवस्था</u> :**

तात्पुरता वीजपुरवठा खंडित झाल्यास माहिम वितळतार कक्ष व माहिम दोष निवारण कक्षाशी संपर्क साधावा दूरध्वनी क्र. ९९२०६५४२४२, ९०२९१३४२४२ व भ्रमणध्वनी क्र. ८८२८८७१६५७ (फक्त व्हॉटस्ॲप मेसेजकरीता), २४३२६६१२, २४३२६६१३, भ्रमणध्वनी क्र. ८८२८८३०२८५ (फक्त व्हॉटस्ॲप मेसेजकरीता). वीज पुरवठा अखंडित ठेवण्यासाठी राखीव पथकांची नेमणुक शिवाजी पार्क मैदान, वनिता समाज या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

**क) <u>मार्गप्रकाश विभाग</u> :**

१) शिवाजी पार्क, चैत्यभूमी, दादर चौपाटी, राजगृह, दादासाहेब फाळके मार्ग, आंबेडकर महाविद्यालय,वडाळा आणि मादाम कामा मार्ग इत्यादी ठिकाणी अतिरिक्त १५० वॅटचे ५८१ LED मार्गप्रकाश दिवे व २००० वॅटचे ४ मेटल हलाईड अतिरिक्त मार्गप्रकाश दिवे बसविण्यात येणार आहे.

२) बाजीप्रभू उद्यान, ज्ञानेश्वर उद्यान आणि महापौर बंगला या ठिकाणी ६ किलो वॅटचे ३ शोधप्रकाश दिवे विशेष मनो-यांवर बसविण्यात येणार आहे.

...५

Scanned with OKEN Scanner

३) मार्गप्रकाश दिव्याचा विद्युत पुरवठा अखंडीत ठेवण्याकरिता ६२.५ केव्हीएचे २ जनरेटर शिवाजी पार्क आणि सुर्यवंशी हॉलजवळ येथे ठेवण्यात येणार आहे.

४) एरिअल लिपट व त्यावरील कर्मचारी आणि व्हीएचएफ सेटस हे २४ तास तैनात ठेवण्यात येणार आहे.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महापरिनिर्वाण दिनासंबंधीची माहिती जाहिरातीच्या माध्यमातून दाखविणारे किऑस्क चैत्यभूमी येथील विविध ठिकाणी मार्गप्रकाश स्तंभावर लावण्यात येणार आहे.

ड) प्रवर्तन व परिरक्षण (उत्तर/पश्चिम) विभाग- अखंडित वीज पुरवठयाकरीता व्यवस्था :

१) उच्च दाब दोष निवारण अभियंत्याचे राखीव पथक तैनात करण्यात येईल. (स्थळ कॅडल रोड वितरण उपकेंद्र).

२) लघूदाब दोष निवारणाकरीता मेन्स अभियंत्यांचे राखीव पथक तैनात करण्यात येईल. (स्थळ नाना नानी पार्क)

३) संग्राही केंद्रातील कर्मचा-यांचे राखीव पथक तैनात करण्यात येईल. (स्थळ व्ही.एस.एन. एल.संग्राही केंद्र आणि माहिम संग्राही केंद्र )

४) वितळतार नियंत्रण राखीव पथक तैनात करण्यात येईल. (स्थळ चैत्यभूमी)

५) ५०० के.व्ही.ए. चे डिझेल जनरेटर व त्यासाठी लागणारे कर्मचारी यांचे राखीव पथक ओम अपार्टमेंट वितरण उपकेंद्र येथे तैनात ठेवण्याची तरतूद करण्यात येईल

६) जवळच्या संधारणेपासून गरज पडल्यावर तात्पूरता वरुन वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यासाठी राखीव पथक तैनात ठेवण्याची तरतूद करण्यात येईल

....६

Scanned with OKEN Scanner

## ब )    वाहतूक विभागातर्फे करण्यात आलेल्या विशेष व्यवस्थेचा तपशील -

बेस्ट उपक्रमाच्या वाहतूक विभागामार्फत महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनुयायांकरिता दिनांक ४ ते ७ डिसेंबर, २०२४ या दिवशी दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा विविध प्रकारच्या सेवा-सुविधा पुरविण्यात येणार आहेत त्या पुढीलप्रमाणे :

१. दादर रेल्वेस्थानक येथून चैत्यभूमिकरिता ४ डिसेंबर २०२४ पासून ते दिनांक ७ डिसेंबर २०२४ पर्यंत दररोज १५ / २० मिनिटांच्या प्रस्थांतराने बससेवा उपलब्ध करण्यात येणार आहे.

२. दिनांक ४ डिसेंबर २०२४ रोजी मुंबईच्या विविध भागांमधून चैत्यभूमीसाठी बसमार्ग क्र.२००, २४१, ए - ३५१ व ३५४ वर बससेवा प्रवर्तित करण्यात येतील.

३. दिनांक ६ डिसेंबर २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, दादर येथून प्रवर्तित होणा-या बसमार्ग क्र. सी - ३३, ए - १६४, २४१, सी - ३०५, ए - ३५१, ३५४, ए - ३५७, ए - ३८५, सी - ४४० आणि सी - ५२१ या बसमार्गांवर अतिरिक्त बसगाडयांचे प्रवर्तन करण्यात येईल जेणेकरुन नियमित प्रवासभाडयात प्रवाशांना चैत्यभूमी येथे पोहचणे सहज साध्य होईल

४. शुक्रवार दि. ६ डिसेंबर, २०२४ रोजी मुंबईतील विविध ठिकाणी असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस्थळांना भेट देऊ इच्छिणा-या अनुयायांकरिता पुढील विशेष बसफे-यांचे आयोजन करण्यात आले आहे.

| अनु क्र. | पासून | पर्यंत | बसेसची संख्या | फेरी वेळापत्रक |
|---|---|---|---|---|
| १. | छत्रपती शिवाजी महाराज उद्यान | छत्रपती शिवाजी महाराज उद्यान | ३ | ७.३०, ८.०० , ८.३० |
| २. | छत्रपती शिवाजी महाराज उद्यान | छत्रपती शिवाजी महाराज उद्यान | ३ | ८.००, ९.००, १०.०० |
| | | एकूण | ६ | |

५. महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणा-या प्रवाशांच्या सोयीकरिता तात्पुरत्या स्वरुपात दैनंदिन बसपास (रु.६०/-शुल्क ) उपलब्ध करण्यात येणार आहेत.

६. . उपरोक्त विविध सुविधा उपलब्ध करण्याकरिता तसेच अनुयायांच्या मार्गदर्शनासाठी चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, वीर कोतवाल उद्यान (प्लाझा) परिसरामध्ये बसवाहक / बसनिरीक्षक यांची नियुक्ती करण्यात येईल.

७. छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे बेस्ट उपक्रमातर्फे Pendal उभारण्यात येईल व या Pendal मधून अनुयायांच्या माहितीकरिता PA System च्या माध्यमातून उद्घोषणा करण्यात येईल. यामध्ये बेस्ट उपक्रमाने उपलब्ध केलेल्या बससेवेबाबतची माहिती प्रामुख्याने अनुयायांना देण्यात येईल.

## क) वैद्यकीय विभागामार्फत करण्यात आलेल्या सेवा सुविधांचा तपशील –

१. अनुयायांकरिता मोफत वैद्यकीय तपासणी, औषधोपचार आणि प्रथमोपचार यांची व्यवस्था करण्यात आली असून त्यासाठी वैद्यकीय विभागाचे डॉक्टर्स, मिश्रक व वैद्यकीय परिचर यांचा समावेश करण्यात आला आहे.

२. बेस्ट उपक्रमाचा वैद्यकीय विभाग आणि के.बी.हाजी बच्चुअल्ली नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिरांतर्गत गरजू व्यक्तींची मोफत नेत्र तपासणी करुन आवश्यकतेनुसार मोफत चष्मे वाटप करण्यात येतील.

३. वैद्यकीय विभागातर्फे क्षयरोग, एडस् / एच.आय.व्ही. विरोधी जनजागृती मोहिम राबविण्यात येईल. तसेच डासांपासून होणा-या मलेरिया, डेंग्यू, चिकन गुनिया या साथीच्या रोगांबद्दल (IEC)च्या माहिती पत्रकांद्वारे जनजागृती करणत येईल.

४. तंबाखुसेवनामुळे होणा-या दुर्धर रोगांबद्दल जनजागृती तसेच तंबाखू व्यसनमुक्तीसाठी समुपदेशन व मॅजिक मिक्सबद्दल माहिती देण्यात येईल.

...८....

Scanned with OKEN Scanner

ड) **<u>कल्याण विभागामार्फत करण्यात आलेल्या सेवा / सुविधांचा तपशील</u>** -

१. अल्पोपहार (बटाटा वडा, समोसा, चिवडा, कचोरी, भाकरवडी, पार्ले-जी-बिस्किट, चहा आणि पिण्याचे पाणी)

२. मोफत नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप शिबिर

३. मोफ़त औषधोपचार

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावरील पुस्तकांचे मोफत वाटप

Scanned with OKEN Scanner